महाराष्ट्र शासन

क्र. : बीसीसी-२०१८/प्र.क्र.२०० A/१६ ब,
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक १८ एप्रिल,२०१८

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त कार्यालय,
नाशिक,नागपूर,औरंगाबाद,पुणे,कोकण, अमरावती.

विषयः- मागास वर्गीय कक्षाकडून बिंदूनामावली पडताळणी बाबत.
संदर्भः- विभागीय आयुक्त कार्यालय,मावक पुणे यांचे क्र. मावक/वशी/२१०/२०१७,
दि. १५.२.२०१७

महोदय,

विषयांकित प्रकरणी आपणास कळविण्यात येते की, मागासवर्ग कक्षाकडून रोष्टर पडताळणी झाल्यानंतर तीन वर्षानंतर किंवा दरम्यानच्या कालावधीत मंजुर पदसंख्येत वाढ / घट झाल्यास पदभरतीच्यावेळी अथवा सेवाप्रवेश नियमात बदल झाल्यास विहित मुदतीपूर्वी बिंदूनामावली नोंदवहीची तपासणी करुन घ्यावी.

२. ज्यावेळी मंजुर पदसंख्या, कार्यरत पदसंख्या व रिक्त पदसंख्या यामध्ये कोणताही बदल होत नसेल अशावेळी दरवर्षी रोस्टर न तपासता दर तीन वर्षांनी रोस्टर तपासणे उचित ठरेल , तथापि, प्रत्येक वर्षी जर कार्यरत पदसंख्येमध्ये बदल होत असेल म्हणजेच रिक्त पदसंख्या बदलत असेल अशा वेळी दरवर्षी रोस्टर तपासून आरक्षण निश्चिती करणे आवश्यक राहील. तसेच पदभरतीच्या वेळी देखील बिंदूनामावली तपासणे आवश्यक राहील.

३. जर कार्यरत पदसंख्येत दरवर्षी बदल होत असुन देखील, रोस्टर तपासले नाही तर आरक्षण निश्चिती चुकीच्या पध्दतीने होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

४. उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, आरक्षणाची योग्य रितीने अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने ज्यावेळी कार्यरत पदसंख्या बदलत असेल अशावेळी म्हणजेच दरवर्षी रोस्टर तपासणे आवश्यक राहील. ज्यावेळी पुढील ३ वर्षे मंजूर,कार्यरत व रिक्त पदसंख्या बदलणार नसेल तर तीन वर्षांनी रोस्टर तपासण्यास हरकत नसावी.

५. मागासवर्ग कक्षाकडून रोष्टर पडताळणी झाल्यानंतर तीन वर्षानंतर किंवा दरम्यानच्या कालावधीत मंजुर पदसंख्येत वाढ / घट झाल्यास अथवा सेवाप्रवेश नियमात बदल झाल्यास तसेच पदभरतीच्या वेळी विहित मुदतीपूर्वी बिंदूनामावली नोंदवहीची तपासणी करणे आवश्यक राहील.

६. वरील प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिनस्त येणा-या सर्व संबंधित क्षेत्रीय कार्यालयांना, आपल्या स्तरावरुन सुचित करण्यात यावे.

आपला,

(टि.वा करपते)
उपसचिव, महाराष्ट्र शासन